# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

सुधिर त्र्यं. राठोड
कुलसचिव

दुरध्वनी क्र. : ०७२४-२२५८३७२
ई-मेल : registrar@pdkv.ac.in


**विद्यापीठांतर्गत अधिकारी/ कर्मचारी यांना स्थायित्व लाभ प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत..**

वाचा: १. शासन परिपत्रक क्र. स्थाप्रप-१४१४/(प्र.क्र. ७३/१४)/१३-अ, दि.११ सप्टेंबर, २०१४.
२. शासन परिपत्रक क्र. स्थाप्रप-१४१५/(प्र.क्र. १४/१५)/१३-अ, दि.१९ सप्टेंबर, २०१७.
३. विद्यापीठ परिपत्रक क्र. बीईए/स्थायित्व प्रमाणपत्र/२०२१/१९३५, दि.२२ नोव्हेंबर, २०२१.
४. विद्यापीठ परिपत्रक क्र. बीईए/स्थाप्रप्र-२/२०२१/४६, दि.२२ फेब्रुवारी, २०२२.
५. विद्यापीठ परिपत्रक क्र. बीईए/स्थाप्रप्र-३/२०२२/५२२, दि.१४ नोव्हेंबर, २०२२.

## परिपत्रक

क्रमांक : बीएए/स्थाप्रप्र-४/२०२३/३८०  दिनांक : १० नोव्हेंबर,२०२३

विहित पध्दतीने नियुक्त झालेल्या, प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणा-या व संदर्भिय शासन परिपत्रक दि. ११/०९/२०१४ मधील विहित अटी व शर्तीची पूर्तता करणा-या प्रत्येक अस्थायी विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करणेबाबतच्या सूचना उपरोक्त नमुद विद्यापीठ परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहे.

याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांना पुन:श्च कळविण्यात येते की आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणा-या पात्र अस्थायी विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करणेबाबतचा निर्णय नियुक्ती प्राधिकारी/कार्यालय प्रमुख यांनी दि. ३० नोव्हेंबर पर्यंत घ्यावा व या दिनांकापर्यंतची स्थिती दर्शविणारा वार्षिक अहवाल त्याच वर्षी दि. १५ डिसेंबर पुर्वी तयार करून दि.३१ डिसेंबर पर्यंत सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच संदर्भ क्र. २ मध्ये नमुद शासन परिपत्रक दि. १९ सप्टेंबर, २०१७, 'परिशिष्ट-अ' मधील मुद्या क्र. १ ते ११ मध्ये स्थायित्व लाभ प्रमाणपत्र प्रदान करण्यासंदर्भातील महत्वाचे मुद्दे व त्याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले असून स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी सदर मुद्दे विचारात घेण्यात यावे.

विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यापैकी गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांच्या बाबतीत नियुक्ती प्राधिकारी यांनी व गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड कर्मचा-यांच्या बाबतीत संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्यवाही करावी. गट-'अ' च्या पदावरील अधिकारी (सहायक प्राध्यापक व त्यावरील शिक्षकवर्गीय पदे तसेच सहायक कुलसचिव व त्यावरील शिक्षकेत्तर पदे इत्यादी) यांचे स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत प्रस्ताव पाठवितांना सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये अचूक माहिती भरून ती प्रस्तावास जोडण्यात यावी व सदर भरलेली माहिती प्रमाणित करता येईल अशा सर्व दस्तऐवजांच्या/ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती तसेच सदर माहितीच्या अनुषंगाने सेवापुस्तकातील नोंदीच्या सांक्षाकिंत प्रतीही सोबत जोडण्यात याव्यात, जेणेकरून विनाविलंब स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करणे सोयीचे होईल. स्थायित्व प्रमाणपत्राकरीता परिपूर्ण प्रस्ताव नियंत्रण अधिकारी यांचे मार्फत नियुक्ती प्राधिकारी यांचे मंजूरीकरीता या कार्यालयास सादर करण्यात यावेत. तसेच योग्य मार्गाने सादर न करण्यात आलेले प्रस्ताव या कार्यालयाव्दारे स्वीकारले जाणार नाही तसेच अपूर्ण दस्तऐवज वा माहितीमुळे स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करण्यास विलंब झाल्यास त्यास संबंधित कार्यालय उत्तरदायी राहील.

स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान केल्याबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये घेऊन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :

१. सर्व संचालक (शिक्षण / संशोधन/ विस्तार शिक्षण), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
संचालक (विस्तार शिक्षण) यांना कळविण्यात येते की, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे १०० टक्के अनुदानाव्दारे पुरस्कृत योजनेअंतर्गत कृषि विज्ञान केंद्राकरीता नियुक्त अस्थायी अधिकारी/ कर्मचारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येवू नये तसेच याबाबतच्या सूचना नियंत्रण अधिकारी या नात्याने आपल्या स्तरावर सर्व कृषि विज्ञान केंद्र यांना देण्यात याव्यात.
२. सर्व अधिष्ठाता (कृषि / कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
३. सर्व सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला/ नागपूर/ गडचिरोली/ मुल,चंद्रपूर/ उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला/ वनविद्या महाविद्यालय, अकोला/ कृषि अभि. महाविद्यालय, अकोला/ पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला/ निम्न कृषि शिक्षण, अकोला/ व.ना.कृ.जै.तं.म.,यवतमाळ/ अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.
४. सर्व विभाग प्रमुख, कृषिविद्या/ कृषि वनस्पतीशास्त्र/ कृषि वनस्पती रोगशास्त्र/मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र/ किटकशास्त्र/उद्यानविद्या/ वनविद्या/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र/ विस्तार शिक्षण/ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
५. सर्व विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी/मृद व जलसंधारण/कृषि शक्ती व औजारे/कृषि प्रक्रिया/कृषि स्थापत्य/ सिंचन व निचरा/ अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आणि विद्युत अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
६. सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस/ज्वारी/तेलबिया/ऊस/कडधान्य/ गहू संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
७. सहयोगी संशोधन संचालक, संशोधन संचालनालय, अकोला/ विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवमाळ/ सिंदेवाही
८. प्रमुख शास्त्रज्ञ, अ.भा.स.सं.प्र.,(कोडरवाहू शेती)/ संशोधन अभियंता, अ.भा.स.सं.प्र.,(कापणी पश्चात तंत्रज्ञान)/ वरिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, अ.भा.स.सं.प्र.,(लिंबूवर्गीय फळे ), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
९. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र / कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११. उपसंचालक संशोधन (बियाणे)/बियाणे संशोधन अधिकारी, बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभाग, अकोला
१२. मुख्य बिजोत्पादण अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणीरंभापूर
१३. मुख्य कृषि विद्यावेत्ता, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्प, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
१४. क्षेत्र अधिकारी, कृषि मुल्य योजना, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
१५. पैदासकार तथा उद्यानविद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१६. माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१७. प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती/ उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल
१८. प्राध्यापक तथा प्रमुख, कृषिविद्या शाखा/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा/ उद्यानविद्या शाखा, कृषि महा., नागपूर
१९. प्रभारी अधिकारी, नागार्जून वनऔषधी केंद्र/मत्सशास्त्र संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
२०. सर्व प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केद्र, अचलपूर/ यवतमाळ/ वाशिम/ बुलढाणा/ एकार्जूना/ कुटकी/ सिंदेवाही/सोनापूर/थारसा/साकोली/ नवेगांवबांध/ पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा/ रामटेक/ कडधान्य व गळीत धान्य संशोधन केंद्र, आमगांव म्हाली/ जवस पैदासकार तथा प्रभारी अधिकारी, जवस संशोधन केंद्र, नागपूर/ महाराजबाग, प्राणी संग्रहालय, नागपूर/ वनशेती संशोधन प्रकल्प, नागपूर
२१. सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, निंबी-मालोकार/ बुलढाणा/ धारणी/ वरुड/ सावंगी/ सेलसुरा/ हिवरा/ मुल-मारोडा
२२. सर्व उपकुलसचिव (आस्थापना/ साप्रवि/ विद्याविषयक)/ सर्व सहायक कुलसचिव, ............................
२३. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/ नागपूर
२४. ........................................................................................................ , डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
२५. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२६. कुलगुरु यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

# स्थायित्व प्रमाणपत्र वार्षिक अहवाल

(दिनांक ३० नोव्हेंबर, .......... पर्यंतची स्थिती दर्शविणारा)

कार्यालय/ विभागाचे नाव :..............................................................................................................

कार्यालयाचे आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांची एकुण संख्या:..................................................

| अ. क्र. | सवंर्ग | संवर्गनिहाय एकुण संख्या | स्थायित्व प्रमाणपत्र धारकांची संख्या | सेवापुस्तकात स्थायित्वाची नोंद घेण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | पात्र असलेल्या तथापि स्थायित्व प्रमाणपत्र अद्याप न देण्यात आलेल्या अस्थायी कर्मचा-यांची संख्या | स्थायित्वासाठी विचार करण्यात आलेल्या तथापि विहित अटींची पुर्तता होत नसल्यामुळे स्थायित्व प्रमाणपत्र न देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती | स्थायित्व प्रमाणपत्र नाकारण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गट-अ | | | | | | |
| | | | | | | | |
| २. | गट-ब | | | | | | |
| | | | | | | | |
| ३. | गट-क | | | | | | |
| | | | | | | | |
| ४. | गट-ड | | | | | | |
| | | | | | | | |
| एकुण | | | | | | | |

कार्यालय प्रमुखांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी